महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३२५ वा | दिनांक : ०८/११/२०२५ | वार : शनिवार

## अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे - अंबादास दानवेंची मागणी



**छत्रपती संभाजीनगर :** अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठं वादळ निर्माण केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी एक रुपयाचाही व्यवहार झाला नसल्याचे अजित पवारांनी पत्रकार परिषद घेत सांगितले. तसेच या प्रकरणातील रजिस्ट्रेशन सुद्धा रद्द करण्यात आल्याची माहिती पवारांनी दिली. आता यावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी आक्षेप घेतला आहे.

अंबादास दानवे म्हणाले, माझा साधा प्रश्न आहे, एखाद्याने चोरी केली, चोरीचा सगळा ऐवज पोलिसांनी जप्त केला. जप्त केल्यानंतर चोरीचा गुन्हा रद्द होतो का? हा माझा साधा प्रश्न आहे. त्यामुळे हा व्यवहार रद्द केला म्हणून हा प्रश्न सुटणार नाही. या प्रश्नात पार्थ पवारांचे नाव का नाही? त्याचे कारण दिले जाते की त्यांची सही नव्हती. कंपनी आहे ती, कंपनीवर गुन्हा दाखल करा. ९९ टक्के शेअर पार्थ पवारांचे आहे, एक टक्का पाटीलचा आहे. ज्याचा एक टक्का शेअर आहे, त्याच्यावर गुन्हा दाखल होतो आणि ९९ टक्के शेअर असणाऱ्यावर गुन्हा दाखल होत नाही? असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, या कंपनीवर गुन्हा दाखल करा. मग या कंपनीकडे ३०० कोटी कुठून आले याची चौकशी करा, जी सरकारी जमीन आहे, ही सरकारी जमीन कशी काय विकली गेली? इथे तुम्ही एक गुंठा जमीन सुद्धा विकता येत नव्हती, यांनी तर सरकारी जमीनच विकून टाकली, ते सुद्धा कोरेगाव पार्कमधली! हे कसे होऊ शकते? मोदींचे सरकार काय म्हणत होते, 'ना खाऊंगा ना खाने दुंगा', इथे काय झाले मग? समजा हे उघड नसते झाले तर? पार्थ पवार मालक झाला असता, त्या एक टक्का वाल्याला दिली असती की यांनी जमीन?

राज्य सरकार लपवाछपवी करत आहे, बनवाबनवी करत आहे, फसवेगिरी करत आहे. पार्थ पवारांवर कारवाई झाली पाहिजे आणि अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली आहे. भाजपचे लोक आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फार साधन शुचितेच्या गोष्टी करतात, इथे ४० एकर जमीन ज्याची किंमत १८०० कोटी रुपये आहे, त्याचा ५०० रुपयात व्यवहार होतो, त्यामुळे पार्थ पवारांवर कारवाई झाली पाहिजे आणि अजित पवारांनी राजीनामा दिला पाहिजे. एकनाथ खडसे यांनी सुद्धा तिथेच जमीन खरेदी केली होती, त्यावरून त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. तशीच कारवाई अजित पवारांवर आणि पार्थ पवार यांच्यावर झाली पाहिजे. महसूल विभाग अजित पवारांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. हे कुबड्यांचे सरकार आहे. भाजपची सवयच आहे, सोबत जो असेल त्याची बदनामी करायची आणि स्वतःच्या कानाखाली ठेवायचे. मग हे नियम सगळ्यांना लावा.

एक रुपयाचाही व्यवहार झाला नाही म्हणतात, ४० एकर जमीन तेही कोरेगाव पार्कमध्ये एखाद्या कंपनीला देते तेही एक रुपया न घेता? हे आणखी मोठे आश्चर्य आहे. जगातले तर हे आठवे आश्चर्य मानायला पाहिजे. अजित पवार नुसत्या गप्पा करत असतात. आता घाला न टायरमध्ये एकेकाला. एखादा मुलगा वडिलांना न सांगता एवढा मोठा व्यवहार करत असेल तर विचार करण्यासाठी गोष्ट आहे. अजित पवारांना माहीत नाही असे होऊच शकत नाही. अजितदादांना क्लीनचिट देणे हे मोठे पाप ठरेल. याच अजित पवारांवर देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी देखील आरोप लावले होते, त्यामुळे आता त्यांनी या प्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली आहे.

## धनंजय मुंडेंनीच मनोज जरांगे पाटलांच्या हत्येचा कट रचला, करुणा मुंडेंचा गौप्यस्फोट



**मुंबई :** माजी मंत्री धनंजय मुंडे आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यातील वाद आता अधिकच पेटला आहे, कारण मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आपल्या हत्येचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. या आरोपांना धनंजय मुंडे यांनी तीव्र विरोध करत फेटाळून लावले असून, त्यांनी या प्रकरणाची सखोल सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या वादात आता स्वराज्य शक्ती सेनेच्या अध्यक्षा करुणा मुंडे यांनी उडी घेतली असून, त्यांनी उलट धनंजय मुंडे यांनीच मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याचा अत्यंत गंभीर दावा केला आहे, ज्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

करुणा मुंडे म्हणाल्या, मनोज जरांगे पाटील यांच्यावरील हल्ल्याचा कट धनंजय मुंडे यांनीच केला असणार. धनंजय मुंडे यांनी स्वतःच्या बायकोला सोडले नाही. गेल्या अनेक वर्षांपासून ते मला त्रास देत आहेत. मनोज जरांगे पाटील यांची आतील टीम फोडण्याचे काम धनंजय मुंडे यांनी केली आहे. पोलिसांच्या कैदेत असलेला आरोपी दादा गरड माझ्याकडे तीन वेळा येऊन गेला आहे. जेव्हा मी जरांगेकडे गेली होती. त्याने मला मेसेज केला तेव्हा मी जरांगेकडे होते. त्यानंतर लगेच धनंजय मुंडेंना माहिती मिळाली की मी मनोज जरांगेंकडे गेली आहे.

पुढे बोलताना करुणा मुंडे म्हणाल्या, दादा गरड यांचे मोबाईल तपासा. व्हॉट्सअॅप चॅट्स आहेत. मेसेज आहेत. धनंजय मुंडे यांनी त्याला सॉरी म्हणून मेसेज केला होता. ते खूप गरीब व्यक्ती आहेत. धनंजय मुंडेंनी त्याला पाच लाख रुपये पाठवले होते. एका गरीब माणसाला धनंजय मुंडे सॉरी का बोलतोय. पाच लाख कशासाठी दिले. हे सर्व पुरावे त्यांच्या मोबाईलमध्ये आहेत. मला दुसऱ्या आरोपीचीही रेकॉर्डिंग त्याने ऐकवली होती. त्यांची १ कोटीची डील सुरु होती, असा गंभीर दावा करुणा मुंडे यांनी केला आहे.

तसेच हेत सत्य बाहेर आणण्यासाठी धनंजय मुंडे, मनोज जरांगे पाटील आणि माझी देखील नार्को टेस्ट करावी, अशी मागणी करुणा मुंडे यांनी केली आहे. धनंजय मुंडे सारखी नासकी वृत्ती आम्हाला संपवायची आहे. धनंजय मुंडेंना मराठवाड्यातून नव्हे, तर देशातून बाहेर काढून अमेरिकेला पाठवावे आणि त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी करुणा मुंडेंनी केली आहे. या सगळ्या संघर्षामुळे आत्महत्या करण्याची वेळ आपल्यावर आली असून मी एकटी पडली आहे, असेही करुणा मुंडे म्हणाल्या.

## दगाबाज सरकारचा पंचनामा करा : उद्धव ठाकरेंचे आवाहन, म्हणाले- सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देऊनही पूर्ण केले नाही

**हिंगोली :** निवडणुकीच्या तोंडावर सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देऊनही त्याचे पालन न करणाऱ्या दगाबाज सरकारचा शेतकऱ्यांनी पंचनामा करावा, असे आवाहन शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी जवळाबाजार व डोंगरकडा येथे केले.

हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा व जवळाबाजार येथे ठाकरे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते आंबादास दानवे, खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हा संपर्क प्रमुख बबनराव थोरात, सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे, जिल्हा प्रमुख अजय उर्फ गोपू पाटील सावंत, संदेश देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना उद्धव ठाकरे म्हणाले की, महायुतीचे सरकार दगाबाज सरकार आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे दिलेले आश्वासन अद्यापही पाळले नाही. खरीप हंगामात पिक, जमिनीसोबतच शेतकऱ्यांचे संपूर्ण आयुष्यच वाहून गेले असून आता त्यांना मदतीची खरी गरज असतांना सरकार जून महिन्यात कर्जमाफी देण्याचे सांगत आहे. जून महिना कशासाठी असा सवाल त्यांनी केला. शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला नाही, काही ठिकाणी पंचनामे झाले नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी शासकिय कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

शासनाकडून शक्तिपीठ महामार्गाचा घाट घातला जात आहे. 86000 कोटी रुपयांचा महामार्ग पूर्ण होईपर्यंत 1.50 लाख कोटी रुपयांचा होईल. त्यासाठी शासनाकडून सुधारीत प्रशासकिय मान्यता काढली जाईल. मात्र शक्तिपीठ महामार्गासाठी पैसे आहेत अन शेतकऱ्यांना देण्यासाठी पैसे का नाहीत असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शक्तिपीठ महामार्ग कंत्राटदार अन दलालांचे उखळ पांढरे करण्यासाठी असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

राज्यात शेतकरी अडचणीत असतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बिहारच्या निवडणुकीत बिझी होते. आता ते पवारांनी बळकावलेल्या जमीनीवर पांघरूण घालण्यात बिझी असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शिवसेना म्हणून आम्ही काम करणारच आहोत पण आता शेतकऱ्यांनी व नागरीकांनीही पुढे येऊन सरकारची वोट बंदी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ नोव्हेंबर २०२५


## रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने बोळेगाव येथे मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन






**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ग्रामीण नागरिकांच्या नेत्र आरोग्य संवर्धनासाठी रोटरी क्लब मुरूम सिटी आणि अजमेरा नेत्रालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने बोळेगाव येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ परिसरातील शेकडो नागरिकांनी घेतला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष रोटे प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून रो. डॉ. नितीन डागा, माजी अध्यक्ष रो. कमलाकर मोटे, माजी सचिव रो. सुनील राठोड, उपाध्यक्ष रो. संतोष कांबळे, रो. शिवशरण वरनाळे, रो. प्रा. भूषण पाताळे, रो. बाबासाहेब पाटील, रो. कल्लाय्या स्वामी, रो. मल्लिकार्जुन बदोले, रो. प्रकाश रोडगे आणि रो. गोविंद पाटील यांची उपस्थिती लाभली. बोळेगाव ग्रामपंचायतीतर्फे सरपंच श्री. विलास पाटील, उपसरपंच सुनील सूर्यवंशी, प्रकाश सूर्यवंशी, पमोल काळे, अभिमन्यू काळे, सोपान सूर्यवंशी, राजेंद्र कुलकर्णी, दादाराव सूर्यवंशी, मल्लू मरबे, अंकुश पाटील, मधुकर सूर्यवंशी आणि रामलिंग गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात सक्रिय सहभाग नोंदविला.शिबिराचे प्रास्ताविक रो. डॉ. नितीन डागा यांनी करताना नेत्र आरोग्याचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोपात रो. प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी "सेवा हेच धर्म" या रोटरी ब्रीदवाक्याची जाण करून देत अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्य जनजागृती वाढत असल्याचे नमूद केले.या शिबिरात एकूण ११४ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी १२ जणांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेकरिता आणि ६ जणांना डोळ्यावर पडदा येण्याच्या उपचाराकरिता अजमेरा नेत्रालय, धाराशिव येथे रेफर करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. संतोष कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन माजी सचिव रो. सुनील राठोड यांनी केले.या उपक्रमामुळे बोळेगाव परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून रोटरी क्लब मुरूम सिटी आणि अजमेरा नेत्रालय यांच्या समाजोपयोगी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## किनगाव राजा ग्रामपंचायत कडून जैन मंदिर येथे शुद्ध पाण्याचे फिल्टर मशीन बसवले



**बुलढाणा (महेश मुंढे)** दि. ७-११ -२०२५ किनगाव राजा ग्रामपंचायत तर्फे १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून गावातील जैन मंदिर येथे शुद्ध पाण्याचे फिल्टर मशीन बसवण्यात आले आहे या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी अल्पशा दरात उपलब्ध झालेले आहे या अगोदरही ग्रामपंचायतने गावामध्ये अजून दोन ठिकाणी शुद्ध पाण्याचे मशीन बसवले आहे त्यामुळे किनगाव राजा ग्रामपंचायत तर्फे गावकऱ्यांच्या आरोग्यदायी जीवनाकडे वाटचाल सुरू आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. ग्रामपंचायतीने स्वच्छता,आरोग्य आणि शुद्ध पाणी पुरवठा या तिन्ही क्षेत्रात पुढाकार घेतला असून" स्वच्छ गाव - निरोगी गाव" हा संदेश देत गावात विकासाची नवी दिशा निर्माण केली आहे. शुद्ध व निरोगी पाण्याच्या फिल्टर मशीन चे उद्घाटन कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्रकाश मुंढे सरपंच ग्रामपंचायत किनगाव राजा, प्रमुख अतिथी गणेश राव राजे जाधव, सुभाष घिके, नवीन कोटेचा, प्रकाश सोनी, गणेश चौधरी,सुखदेव साळवे व ग्रामसेवक अमोल मेहेत्रे हे उपस्थित होते. मा. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दीपक पाटील, ग्रामपंचायत सदस्य योगेश चतुर, संतोष काकड, सखाराम हरकळ, दत्तात्रय झोरे व इतर उपस्थित होते श्रीकांत काळुसे, संदीप काळुसे, गजानन मुंढे, शिवानंद मुंढे अमोल साळवे, दिनेश पाखरे,गजानन राजे जाधव,पिंटू साळवे, संतोष नागरे,सोनू पाटील,सतीश देवरे यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश मुंडे प्रमुख अतिथी गणेश राजे जाधव, सुभाष घिके, नवीन कोटेचा यांनी आपले मनोगत व्यक्त केले व ग्रामपंचायत व प्रशासनाचे आभार मानले व सुभाषचंद दुगड यांनी आपल्या मालकीच्या बोअर वेल चे पाणी उपलब्ध करून दिल्यामुळे त्याचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश सोनी यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दीपक पडुळकर यांनी केले. ग्रामपंचायतच्या या उपक्रमाचे गावकऱ्यांकडून कौतुक होत असून स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत शुद्ध पाण्याच्या फिल्टर मशीन चे उद्घाटन करण्यात आले या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याची वार्षिक तपासणी



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** कन्नड तालुक्यातील पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण या पोलीस ठाणे ची वार्षिक तपासणी करण्यात आली त्यावेळी पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, कन्नड खुलताबाद तालुक्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री मॅडम आणि पोलीस स्टेशन कन्नड ग्रामीण चे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र पवार यांनी वार्षिक तपासणी विषयी पोलीस पाटील यांच्या कामगिरीबाबत वेळोवेळी पोलीस पाटील सूचनेप्रमाणे मागवलेली माहिती प्रत्येक पोलीस पाटील हा वेळोवेळी पोलीस स्टेशन येथे कळवत असतो तसेच कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन अंतर्गत ५७ गावे येत असून सध्या फक्त २८ पोलीस पाटील कार्यरत आहेत यातील ब-याचशा पोलीस पाटलांकडे अतिरिक्त गावे दिली आहे त्यामुळे पोलीस पाटीलांवर ब-याचशा कामाचा बोजा पडत आहे तरीदेखील कुठल्याही कामाची काटकसर न करता पोलीस पाटील कामे करत आहेत एवढे सांगून थांबले आणि पोलीस अधीक्षक (SP) यांनी पोलीस पाटलांना मार्गदर्शन करण्याकरिता सहाय्यक पोलीस निरीक्षक रामचंद्र पवार यांनी विनंती केली.सर्वप्रथम सर्व पोलीस पाटलांचा परिचय करून घेतला त्यामध्ये गावाची लोकसंख्या गावात कोण कोणत्या धर्माचे नागरिक राहतात गावातील गुन्ह्याचे प्रमाण येणा-या निवडणूक बाबत चोख बंदोबस्त पाळावा निवडणूक काळात गावातील हालचालींवर लक्ष ठेवावे वेळोवेळी काही अडीअडचणी येण्याचे निदर्शनास आल्यास ताबडतोब पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा अशा प्रकारे वेगवेगळी माहिती देऊन मार्गदर्शन केले त्याचबरोबर पोलीस पाटील हा गावाचा पोलीस असून ग्रामीण भागातील पोलीस प्रशासनाचा महत्वाचा कणा आहे असेही सांगितले पोलीस पाटलांच्या वतीने (SP)पोलीस अधीक्षक,(DYSP) उपविभागीय पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचे सत्कार करण्यात आले त्यावेळी काकासाहेब पवार पोलीस पाटील वडाळी काळू पथवे पोलीस पाटील कळंकी दादासाहेब पांचाळ पो पा हिवरखेडा गणेश शिंदे पो पा शिवराई वसंत पवार पो पा बेलखेडा दिपक कोळी बोरमाळी तांडा श्रीमती उषा राठोड भांबरवाडी निर्मला पवार जामडीघाट सुनिता इंगळे शिरोडी अनिल उघडे कोळवाडी आसाराम कलाल पेडकवाडी सुनिल पवार वडनेर तांडा सुधीर सोनवणे आडगाव मनोज जाधव गुदमा ज्ञानेश्वर कदम सिरजापूर अरविंद धनेधर चिखलठाण नामदेव घुले बोलटेक आदि कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशनचे सर्व पोलीस पाटील तपासणी (इन्स्पेक्शन) वेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ नोव्हेंबर २०२५


## वात्रटिका : निवडणुकीचा तमाशा

गावात लागली निवडणुकीची धामधूम
नेते आले घेऊन वचनांची झुमझुम
पोस्टरवर हसरे चेहरे, हात जोडले वाकून
आणि जनता म्हणे — येतोय पुन्हा नाटक बघून

घरोघरी भेटी  मिठाईचे डबे
तुमचं सुख आमचं ध्येय म्हणे ते नवे नवे
मत मागताना पाय धरणारे नेते
पाच वर्षांनी दिसतात फक्त फोटोमध्ये भेटे

प्रत्येक भाषणात विकासाचा जयघोष,
रस्ता  पाणी नोकरी — सर्व काही होईल खास
पण निवडून आल्यानंतर फोनच न उचलतो
जनतेचा मेसेज  डिलिव्हरवरच थांबतो

एक पक्ष म्हणे — तो चोर मोठा
दुसरा म्हणे — हा तर जनतेचा तोटा
दोघे मिळून शेवटी घेतात शपथ
जनभावनेचा करण्या हो घात

मतदानाच्या दिवशी ओळींत जनता थांबे
उद्या पोटासाठी पुन्हा रांगेतच उभे
एकदा की लोकशाहीचा उत्सव संपला
नेता कधी होत नाही  आपला

**//काव्य रचना//**
संदिप नानासाहेब वाकडे
रा.खेडा ता.कन्नड
९७६६९९२७७६

## हस्ता येथे आरोग्य तपासणी व उपचार शिबिर संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** तालुक्यातील हस्ता येथे घाटमाथा सामाजिक प्रतिष्ठान व कमलनयन बजाज हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वास्थ अभियान उपक्रमांतर्गत मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात कमलनयन बजाज हॉस्पिटलची तज्ञ टीम स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, जनरल फिजिशियन, फिजिओथेरपीस्ट इ. तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून हस्ता गावातील ग्रामस्थांची आरोग्य व उपचार करण्यात आले. यावेळी हस्ता चे सरपंच दीपक भाऊ आखाडे, शामराव पाटील निळ, भिकन आप्पा शिंदे, ज्ञानेश्वर जंगले, अंकुश निळ, संकेत शिंदे, शिवनारायण जैस्वाल,बद्री खंडेवाल, दादासाहेब शिंदे, भाजपा प्रमुख पदाधिकारी प्रमोद पाटील पवार, हरीश वाघ, राहुल सोनवणे, अशोक मांडोळे, नागेश तांदळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन भाजपा महिला पदाधिकारी मनीषाताई रामदास आव्हाळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन भाजपा तालुका अध्यक्ष गणेश घुगे यांनी केले होते.

## शिक्षक व अधिकारी क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** दिनांक सात नोव्हेंबर रोजी विनायकराव पाटील महाविद्यालयात शिक्षक व अधिकारी यांच्या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी मोहम्मद सबाहत यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. डॉ.सुनीता शिंदे-देशमुख व विस्तार अधिकारी मनीष दिवेकर, तालुका क्रीडा संकुल समितीचे सदस्य व क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे,कार्यलीन अधीक्षक अशोक जाधव योगेश पाटील ,संदीप कुलकर्णी, डॉ बालाजी एकोरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत बॅडमिंटन, व्हॉलिबॉल, गोळफेक, थाळीफेक,१०० मीटर धावणे, भालाफेक आदी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत एकूण ६० शिक्षक व अधिकारी यांनी सहभाग घेतला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी एजाज शहा, विशाल दांडेकर, विनोद राठोड प्रवीण भदाणे, माधुरी कुलकर्णी चंद्रकांत कोळी, सुनंदा मते,सचिन वेताळ,अशोक गोसावी, ईश्वर दुबे, सारिका जोशी. यांनी काम पाहिले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ नोव्हेंबर २०२५


# We Learn English - आमचा आत्मविश्वास वाढवणारा उपक्रम






**आ**जच्या आधुनिक जगात इंग्रजी भाषा ही शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि दैनंदिन जीवनात अत्यंत महत्त्वाची बनली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने इंग्रजी शिकले पाहिजे, कारण ती जागतिक संवादाची भाषा आहे. याच उद्देशाने आमच्या अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेत “We Learn English” (आम्ही इंग्रजी शिकतो) हा उपक्रम राबवण्यात आला आहे.या उपक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा आत्मविश्वासाने बोलता यावी, त्यांची संभाषण कौशल्ये विकसित व्हावीत आणि इंग्रजी शिकण्याची भीती कमी व्हावी. हा उपक्रम विशेषतः इयत्ता - चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आला आहे. चौथीच्या लहानग्यांना इंग्रजी बोलण्याची गोड आवड निर्माण व्हावी म्हणून हा उपक्रम आनंददायी आणि कृतीप्रधान पद्धतीने घेतला जातो.आतापर्यंत या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी ८४ धडे (Lessons) पूर्ण केले आहेत. प्रत्येक धड्यात (Lesson)मध्ये नवे शब्द, वाक्यरचना, प्रश्नोत्तर, संभाषण आणि खेळ यांच्या माध्यमातून इंग्रजी शिकवले जाते. विद्यार्थी दररोज थोडा वेळ इंग्रजी बोलण्याचा सराव करतात. ते आपल्या मित्रांशी आणि शिक्षकांशी इंग्रजीत संवाद साधण्याचा प्रयत्न करतात.उदाहरणार्थ, ते म्हणतात —👉 “Good morning, teacher!”👉 “May I come in?”👉 “How are you?”👉 “I am fine, thank you.”👉 “Let’s play together.”अशा छोट्या-छोट्या वाक्यांमुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्याचा आत्मविश्वास मिळतो.या उपक्रमात माझ्या वर्गातील विद्यार्थी नियमित सहभाग घेत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने धडे (Lesson) मनापासून पाठ करत आहेत. शिक्षक धडे (Lesson) समजावून सांगताना चित्रे, कृती, गाणी, नाटिका आणि खेळ यांचा वापर करतात. त्यामुळे वर्गात एक उत्साही आणि आनंदी वातावरण तयार होते. इंग्रजी शिकणे आता विद्यार्थ्यांसाठी कंटाळवाणे न राहता एक मजेशीर खेळासारखे बनले आहे.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक सकारात्मक बदल दिसून आले आहेत. ते आता इंग्रजी ऐकताना अधिक लक्ष देतात, वाचताना अर्थ समजून घेतात आणि बोलताना आत्मविश्वासाने वाक्य तयार करतात. त्यांच्या उच्चारात सुधारणा झाली आहे आणि चुका करण्याची भीती कमी झाली आहे.याचसोबत या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना, संवादकौशल्य, आणि नेतृत्त्वगुण वाढवले आहेत. गटांमध्ये काम करताना ते एकमेकांना मदत करतात आणि चुका दुरुस्त करतात. काही विद्यार्थी छोट्या नाटिका तयार करून इतरांसमोर सादर करतात, ज्यामुळे त्यांना स्टेजवर बोलण्याची सवय लागते.“We Learn English” हा उपक्रम केवळ भाषाशिक्षणापुरता मर्यादित नाही, तर तो विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त आणि आनंदाने शिकण्याची वृत्ती देतो.अशा उपक्रमांमुळे आमचे विद्यार्थी खऱ्या अर्थाने उपक्रमशील, सर्जनशील आणि प्रगतिशील बनत आहेत. ते केवळ इंग्रजी शिकत नाहीत, तर स्वतःवर विश्वास ठेवून पुढे जाण्याची तयारीही करतात.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जो आत्मविश्वास आणि आनंद दिसतो, तोच आमच्या शाळेचा खरा अभिमान आहे. “We Learn English” हा उपक्रम म्हणजे आमच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची सुरुवात आहे. " We learn English “


**विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड**
अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा, पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी.मो.९०९६०७५६३०


# व्यायामाची महती

थंडीचे दिवस
असतात किती छान
रोज सकाळी उठून
शरीर बनवूया बलवान

आळस आपला शत्रू
दूर त्याला सारा
ध्येय गाठण्यासाठी
झेलूया सकाळचा वारा

असो कितीही थंडी
नको तिचे लाड
सकाळी पांघरूण घेवून
झोपायचे नाही गाढ

धावत-धावत मैदानाला
चकरा मारूया चार
शरीर बळकट होईल
घालता सूर्यनमस्कार

उत्साह आणि स्फूर्ति वाढते
सकाळच्या व्यायामामुळे
रोज न्याहारीला घेवूया
दूध आणि ताजी फळे

निरोगी शरीरात असते
सदा निरोगी मन
सुदृढ शरीरसंपत्ती
हेच आपले खरे धन


**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# मुकुंदवाडी मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये तालुकास्तरीय शिक्षकांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** मुकुंदवाडी मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेमध्ये तालुकास्तरीय शिक्षकांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षणाधिकारी श्री. भरत तीनगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या.कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून डायटचे अधिव्याख्याता डॉ. राजेश चौधरी उपस्थित होते.सदर स्पर्धांमध्ये पंच म्हणून श्री. के. बी. चौधरी (मुख्याध्यापक), श्री. सचिन गायकवाड आणि श्री. दीपक महानवर यांनी काम पाहिले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडाशिक्षक श्री. सय्यद इरफान यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ नोव्हेंबर २०२५

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन 'विद्यार्थी दिन' जल्लोषात साजरा




**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन 'विद्यार्थी दिन' जल्लोषात साजराडॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक जीवनाची सुरवात सातारा येथील प्रतापसिंह हायस्कुल येथे प्रवेश घेऊन दि.०७ नोव्हेंबर १९०० रोजी झाली असून या दिनाचा गौरव म्हणून आज रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट येथे 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन- विद्यार्थी दिन' जल्लोषात साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थीच देशात बदल घडवू शकतात, जगाच्या पाठीवर विद्यार्थ्यांनीच क्रांती केली असून भारत देश या परिवर्तनाचा वाहक ठरणार असल्याचा सूर यावेळी उमटला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जोपासलेला शिक्षणाचा व्यासंग, प्रतिकूल परिस्थितीत घेतलेले शिक्षण, आपल्याला दिलेला शिका संघटित व्हा संघर्ष करा हा मूलमंत्र समजून घेऊन आपल्या शिक्षणाचा वापर हा समाजपरिवर्तनासाठी करावा असे आवाहन आयोजक सचिन निकम यांनी केले.यावेळी रिपब्लिकन सेनेचे नेते प्राचार्य सुनील वाकेकर, जिल्हाध्यक्ष मिलिंद मोकळे, काकासाहेब गायकवाड, शहरप्रमुख नितीन वाकेकर, मध्य अध्यक्ष राहुल गवळी, राहुल कानडे, मधुकर मघाडे, असजद खान, महेश तांबे, प्रा.प्रबोधन बनसोडे, बालाजी सोनवणे, नकुल पाटील, अनिल तुपे, महिला शहराध्यक्ष प्रा.संगीता अंभोरे, सागर ठाकूर, प्रवीण शिंदे, युवा जिल्हाध्यक्ष गुलाब जाधव,अकबर शेख, रामराव नरवडे,मुकेश घुमारे, अनिल खरात आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# श्रीकृष्ण महाविद्यालयात सार्ध शताब्दी महोत्सव साजरा




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात वंदे मातरम् या गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वंदे मातरम् सामूहिक गीत गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. महादेव खोत व प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले हे होते. कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. राजाराम निगडे म्हणाले की बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी आनंदमठ नावाच्या पहिल्या कादंबरीतून १९७० च्या दशकात हे गीत प्रसिद्ध केले. त्यावेळी इंग्रजी राजवटीच्या जुलमी प्रशासनात सर्वसामान्य जनता होरपळून निघाली होती. त्यावेळी राष्ट्र नावाच्या संकल्पनेचा अल्पसा परिचय होणे सुद्धा दुरापास्त झाले होते. अशा दुरवस्तेत भारतीय जनतेला या अजरामर गीताने प्रेरणा देण्याचे फार मोठे कार्य केले. हे गीत पहिल्यांदा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या १८९६ ला भरलेल्या राष्ट्रीय अधिवेशनात गायले गेले. खऱ्या अर्थाने तिथूनच या गीताचा प्रेरणादायी प्रवास चालू झाला. हे गीत राष्ट्राभिमानाने आणि राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरले आहे. आज या गीताला जवळपास १५० वर्ष झाले आहेत. यापुढेही हे गीत राष्ट्राला सतत प्रेरणा देत राहील यात कांहीच शंका नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. एम. जी. आंबुसे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. डी. पी. चव्हाण यांनी मांडले. वंदे मातरम् या गीताच्या सामूहिक गायनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ नोव्हेंबर २०२५

# शहरीकरण : विकासाचे क्षितिज की सामाजिक संतुलनाचे आव्हान

दरवर्षी 8 नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक शहरीकरण दिन' म्हणून पाळला जातो. आधुनिक मानवसभ्यतेपुढील सर्वात वेगाने घडणाऱ्या सामाजिक प्रक्रियांपैकी शहरीकरण ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. शहरांचा विस्तार, लोकसंख्येचे स्थलांतर, जीवनशैलीतील बदल, पर्यावरण-विकासातील संघर्ष, अर्थव्यवस्थेतील नवीन संरचना आणि सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेचा पुनर्विचार यांद्वारे शहरीकरण मानवी समाजाचे भविष्य ठरवत आहे. आज जगातील 40 टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरी भागात राहते आणि पुढील काही दशकांत ही संख्या 70 टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असे तज्ज्ञ मानतात. अशा परिस्थितीत शहरीकरणाचा अभ्यास केवळ भौगोलिक किंवा आर्थिक विषय नसून मानवी जीवनाच्या समग्र परिवर्तनाची प्रक्रिया म्हणून पाहण्याची गरज आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शहरीकरण समजून घेताना आपल्याला व्यक्ती, कुटुंब, समुदाय, संस्था, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक संरचना, सामाजिक समस्या या सर्व स्तरांकडे एकत्र पाहावे लागते. कारण शहरीकरण हे केवळ माणूस कुठे राहतो याचा प्रश्न नसून माणूस कसा राहतो, कसा विचार करतो, आणि कशातून आपली सामाजिक ओळख घडवतो याचा प्रश्न आहे.शहरीकरणाची प्रक्रिया पाहताना सर्वप्रथम लक्षात येते ते म्हणजे ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे झपाट्याने होणारे स्थलांतर. ग्रामीण भागातील रोजगाराच्या मर्यादित संधी, शेतीवरील अवलंबन, शेती उत्पन्नातील अस्थिरता, शिक्षण आणि आरोग्य सुविधा अपुऱ्या असणे, तसेच आधुनिक जीवनशैलीकडे आकर्षण या कारणांमुळे लोक शहरांमध्ये संधींच्या शोधात येतात. शहर व्यक्तीला नवीन ओळख, आर्थिक स्थैर्य, कौशल्यविकास आणि प्रगतीची संधी उपलब्ध करून देते. विशेषतः युवकांसाठी शहर 'स्वप्नपूर्तीचे केंद्र' ठरते. शिक्षण संस्था, उद्योग, आय टी कंपन्या, व्यावसायिक क्षेत्रे, सर्जनशील उपक्रम आणि उद्यमशीलतेच्या संधी यामुळे शहर आधुनिक उन्नतीचा प्रतीक बनते. स्त्रियांसाठी विशेषतः शहराने शिक्षण, रोजगार आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने नवे दरवाजे उघडले आहेत. त्यामुळे शहरीकरणाने स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळीला नवीन गती दिली आहे.परंतु शहरीकरणाचे वास्तव इतके सरळसोपे नाही. संधींसोबतच शहरात आव्हानांचे प्रचंड जाळेही आहे. शहर म्हणजे चमकणारे दिवे, उंच इमारती, व्यस्त रस्ते आणि गतिमान वाहतूक होय. परंतु या चमकाखाली संघर्ष, असमानता, तणाव आणि अस्थैर्याचे वास्तव दडलेले असते. ग्रामीण भागातून शहरात आलेल्या बहुसंख्य लोकांना परवडणारी घरे मिळत नाहीत. शहरातील जमीन महाग आणि मर्यादित असल्याने झोपडपट्ट्या विकसित होतात. झोपडपट्टीकरण हे शहरीकरणाचे मोठे सामाजिक आव्हान आहे. अरुंद घरं, गर्दी, अस्वच्छता, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव, आरोग्यसेवा अपुरी, वाहतूक आणि शिक्षणाच्या मर्यादित सुविधा यामुळे शहराचा विकास एकतर्फी आणि विषम वाटू लागतो. एका बाजूस गगनचुंबी इमारती आणि आलिशान सोसायट्या, तर दुसऱ्या बाजूस झोपड्या ही दृश्यगती शहरीकरणातील सामाजिक विषमतेचे प्रतीक बनते.समाजशास्त्राच्या भाषेत शहर हा 'व्यक्तिनिष्ठ समाज' (Individualistic Society) मानला जातो. ग्रामीण समाजात नाती, परस्परसहकार्य, शेजारधर्म आणि वृत्तीतील एकोप्याला महत्त्व असते. परंतु शहरात व्यक्तीची जीवनशैली अधिक स्पर्धात्मक, वेगवान आणि एकाकी होते. कामाचा ताण, वेळेचे बंधन, करिअरची धडपड, आर्थिक खर्चाचा दबाव यामुळे सामाजिक नात्यांची उब कमी होते. कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीनेही शहरीकरणाचे परिणाम खोलवर आहेत. संयुक्त कुटुंबे कमी होत गेली आणि विभक्त कुटुंब प्रबळ झाले. पालक आणि मुलांमधील संवादाचे स्वरुप बदलले. ज्येष्ठ आणि बालक सांभाळण्याची जबाबदारी वाढली. वृद्धांची सामाजिक स्थानिक ओळख कमी झाली. तरुण पिढी आधुनिक विचारसरणी अंगीकारताना परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यसाखळी यांच्यात अंतर वाढू लागले.सांस्कृतिक स्तरावर शहर जागतिक संस्कृतीचे प्रवेशद्वार बनले आहे. फॅशन, ग्लोबल मीडिया, मनोरंजन क्षेत्र, डिजिटल संस्कृती, उपभोक्तावाद आणि ब्रँड ओळखीमुळे व्यक्तीचे आत्ममूल्य 'उपभोग क्षमते'वर आधारित होत चालले आहे. समाजात प्रतिष्ठा, सन्मान आणि ओळख यांचे अर्थ बदलत आहेत. आजचा माणूस 'असण्यात' कमी आणि 'दिसण्यात' अधिक गुंतला आहे. त्यामुळे जीवनातील समाधानाचा स्रोत वस्तूंमध्ये, अनुभवांमध्ये आणि बाह्यकेंद्रित यशात शोधला जात आहे. त्यामुळे मानसिक आरोग्यावरही शहरीकरणाचे गंभीर परिणाम दिसून येतात. तणाव, नैराश्य, एकटेपणा, स्पर्धा, असुरक्षितता आणि भावनिक अस्थिरता हे शहरी जीवनाचे छुपे साथीदार झाले आहेत.शहरीकरणाचे आणखी एक मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणीय असंतुलन होय. शहरांचा विस्तार म्हणजे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण होय. जंगलांची तोड, नदी आणि नाले बुजवणे, वाहनांची वाढ, रासायनिक उत्सर्जन, प्लास्टिक कचरा, पाणी, ध्वनी आणि हवा प्रदूषण यामुळे शहरांचे पर्यावरण अस्वस्थ झाले आहे. पावसाळ्यात शहरी पूर, उन्हाळ्यात पाण्याची टंचाई, हवेच्या गुणवत्तेत घट, उष्ण बेट प्रभावामुळे तापमान वाढ आणि ऋतुचक्रात विसंगती असे परिणाम सर्वत्र दिसतात. अशी परिस्थिती मानवाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करते.तरीही, शहरीकरणाचे सकारात्मक पैलूही तितकेच ठळक आहेत. शहर ही प्रगतीची प्रयोगशाळा आहे. येथे विविध भाषा, संस्कृती, धर्म, परंपरा, विचारधारा आणि जीवनशैली एकत्र येतात. त्यामुळे शहरात विविधतेतून नवी सामाजिक रचना निर्माण होते. शिक्षण संस्थांमुळे वैज्ञानिक दृष्टी वाढते, संशोधन व नवकल्पना घडतात, कला-साहित्य-नाट्य-संगीत-विचार यांची देवाणघेवाण होते. मानवाधिकार, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, युवा सहभाग अशा आधुनिक चळवळी शहरांतूनच गतिमान झाल्या आहेत. शहर कल्पनांना उलगडते, व्यक्तिमत्त्व घडवते आणि स्वप्ने जगण्याची संधी देते.म्हणूनच, प्रश्न शहरीकरणाचा विरोध करण्याचा नाही; तर त्याला योग्य दिशादर्शन देण्याचा आहे. शहरी विकास सर्वसमावेशक, पर्यावरणपूरक, मानवी मूल्यांवर आधारित आणि सामाजिक न्याय साधणारा असायला हवा. शहरांची रचना 'माणूस-केंद्रित' असावी; केवळ पायाभूत सुविधांवर आधारित नाही. सार्वजनिक वाहतूक, परवडणारी घरे, स्वच्छता, आरोग्य सुविधा, हरित क्षेत्र, पादचारी व सायकल मार्ग, सांस्कृतिक खुली मैफिली, सामुदायिक संवादाची जागा ही सर्व शहराच्या आरोग्यासाठी तितकीच आवश्यक आहेत जितकी उद्योग आणि तंत्रज्ञान आवश्यक आहे.जागतिक शहरीकरण दिनाचे महत्त्व हेच की आपण शहरांच्या वाढीला फक्त वेग द्यायचा नाही, तर दिशा द्यायची आहे. शहर विकसित व्हावं, पण त्याचसोबत नाती, भावना, पर्यावरण, सामाजिक न्याय आणि मानवी सन्मान यांचे संरक्षण व्हावे. शहर उंच व्हावं, पण माणसाचं मनही उंच राहिलं पाहिजे. शहरांनी समता आणि मानवतेचा स्पर्श न हरवता संधी दिल्या पाहिजेत.शेवटी, शहर हे केवळ भौगोलिक जागा नसून 'मानवी जीवनाचा स्पंदनबिंदू' आहे. शहरांनी जर माणसाला सहकार्य, संवेदना, विश्वास आणि परस्परसंबंध यांसह जगायला शिकवले तरच शहरीकरण खऱ्या अर्थाने मानव सभ्यतेच्या विकासाचा दीपस्तंभ बनेल. अन्यथा, शहरीकरण प्रगतीच्या नावाखाली मानवी आत्म्याला निर्जीव करणारा प्रवास ठरू शकतो. म्हणूनच आजच्या या जागतिक शहरीकरण दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या शहरांकडे फक्त 'रचना' म्हणून नव्हे, तर 'जीवनशैली, संस्कृती आणि मानवी संबंधांचे घर' म्हणून पाहण्याची संवेदनशीलता जपली पाहिजे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(समाजशास्त्राचे अभ्यासक) मो. 9960103582,
ईमेल -
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002